# टिळक आणि कामगार चळवळ

**प्रो. डॉ. गीताली टिळक**

लोकमान्य टिळकांची कामगारांविषयीची भूमिका आणि त्यांचे कामगार – चळवळीतील कार्य यावर भाष्य करणारा लेख.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे स्वराज्याचे उद्गाते म्हणून आपणाला माहिती आहेत. भारतीय आणि पाश्चिमात्य विचारसरणी आणि इतिहासाचे अभ्यासक म्हणून टिळकांनी आपली स्वराज्याच्या उद्देशाच्या लढ्याची रणनीती निश्चित केली होती. अनेक भाषा, धर्म, जाती राज्यांमध्ये विभागलेल्या हिंदुस्थानातील सर्व लोकांना एकत्र आणून त्यांच्यात राष्ट्रीयत्व जागृत करण्याचे कार्य जसे टिळकांनी केले तसेच स्वराज्याच्या मागणीच्या लढ्यात फूट पाडणाऱ्या सुधारणा, जातिभेद चळवळींना त्यांनी दूर ठेवले.

१८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात सर्वसामान्य लोकांचा सहभाग नव्हता. त्यामुळे जोपर्यंत राष्ट्रीयत्व, एक राष्ट्र याची जाणीव सर्वसामान्यांना होत नाही तोपर्यंत स्वराज्याची कल्पना उभी राहू शकणार नाही हे लोकमान्य जाणून होते.

वर्षातून एक-दोन वेळा जमून इंग्रजांकडे काही मागण्यांचे ठराव करणाऱ्या काँग्रेसचा प्रवास टिळकांना मान्य नव्हता. स्वराज्याचे कार्य हे पूर्णवेळ काम करण्याचे आहे, हे टिळकांनी जाणले होते. त्याकरिता त्यांनी केसरीतून समाज जागृतीचे कार्य हाती घेतले. हिंदुस्थानची आर्थिक लूट कशी होत आहे याची जाणीव लोकांना करून दिली. लोकांना राष्ट्रीयत्वाची जाणीव करून दिली होती.

१८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात गाय आणि डुकराच्या चरबी काडतुसांना लावल्यामुळे इंग्रजांनी धार्मिक बाबतीत लक्ष न घालण्याचे ठरवले होते, त्यामुळे सर्व जातिधर्माच्या लोकांना एकत्र आणण्यासाठी १८९४ साली सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. देवळातील, घरातील सोवळे ओवळे सांभाळणारा बाप्पा रस्त्यावर राष्ट्रीय उत्सव म्हणून बसवला. उत्सवप्रिय समाजाने गणपती उत्सव अतिशय कमी काळात स्वीकारला. भाषण, मेळे, संगीत, कीर्तने अशी माध्यमे वापरून टिळकांनी लोकशिक्षण सुरू केले.

गणेशोत्सवाबरोबर टिळकांनी फेमिन कोड आणि दारूबंदी या दोन चळवळी सुरू केल्या. त्यामुळे शेतकरी, कामगार, ब्राह्मणेतर समाज लोकमान्यांचे नेतृत्व स्वीकारू लागला.

स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण ही लोकमान्य टिळकांची चतु:सूत्री गणेशउत्सव व शिवजयंतीच्या माध्यमातून लोकांना समजली होती. टिळकांनी भारताचे अर्थकारण ९०% शेतीवर अवलंबून आहे हे ओळखले होते. शेतीची अवजारे, बियाणे बदलावे लागतील, ठिकठिकाणी शेतीच्या मालाचे प्रक्रिया उद्योग उभे राहावेत यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

टिळक विचार हा आधुनिकता, वास्तवता आणि

व्यवहारिकतेवर उभारला आहे. शेतीसाठी त्यांनी साखर कारखाने, सूत उद्योग, विणकर यांचे प्रश्नावर जसे भाष्य केले. तसेच उद्योग क्षेत्र उभारावे म्हणून स्वदेशी बँक, स्वदेशी दुकाने, कौशल्य विकास प्रशिक्षण या गोष्टी फक्त सांगितल्या असे नाही तर त्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. सहकारी तत्त्वाचा विकास केला. याचमुळे केवळ शेतकरी वर्ग न राहता कामगार हा जातीविरहित नवा वर्ग भारतात निर्माण झाला होता.

कार्ल मार्क्स आणि कम्युनिझमची ओळख भारतात प्रथम १ मे १८८१ रोजी मराठामध्ये टिळकांनी करून दिली. मुंबई विद्यापीठाचे प्राध्यापक कै. जे.व्ही. नाईक यांनी अखिल भारतीय इतिहास काँग्रेसच्या ६व्या सेशनमध्ये प्रथम सांगितली. श्रम म्हणजे संपत्ती आणि वर्ग लढा यावर टिळकांनी टिपणी प्रकाशित केली. टिळकांची प्रस्तावना वाचल्यावर हिंदी कामगारांविषयी टिळकांना किती तळमळ वाटत होती हे स्पष्ट होते.

मानवी संस्कृतीच्या प्रगतीबरोबर कार्ल मार्क्सचा 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' किती महत्त्वाचा आहे याबाबत टिळक म्हणतात, 'या निबंधाच्या वाचनाने वाचकांच्या मनात इष्ट स्वरूपाची व उपक्रांती नक्की घडून येईल.' कामगारांचे भांडवलदार वर्गाकडून केले जाणारे निर्दयी शोषण व त्यातून होणारा वर्गसंघर्ष, याचे सखोल विश्लेषण मार्क्सने मोठ्या मार्मिकतेने सांगितले. याची माहिती टिळकांनी १८८१ मध्ये करून दिली.
(संदर्भ: श्री. प्रताप वेलकर–अव्यक्त लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, पान १२७)

लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेश उत्सव मुंबईमध्ये खूप विस्तारला. कामगार त्यात मोठ्या संख्येने भाग घेत. टिळक स्वत: वेगवेगळ्या मंडळांना भेटी देत. ठिकठिकाणी भाषणे करत. मुंबईतील त्यांच्या सभांना हजारोंच्या संख्येने लोक जात होते. त्यात बंगालच्या फाळणीनंतर स्वदेशी व बहिष्काराला सर्वसामान्य लोकांनी, कामगारांनी प्रचंड प्रतिसाद दिला.

टिळकांच्या या वाढत्या लोकप्रियतेचा धोका इंग्रज गव्हर्नरच्या लक्षात आला. त्याने व्हाईसरॉयकडे टिळकांना हद्दपार करण्याची मागणी केली. मुझफ्फूरमधील बॉम्बस्फोटाचे कारण मिळाले. केसरीमधून टिळकांनी या घटनेच्यावर १२ मे १९०८ रोजी पहिला 'देशाचे दुर्दैव' आणि १९ मे १९०८ रोजी 'दुहेरी इशारा' आणि २ जून रोजी 'बॉम्ब गोळ्याचे रहस्य' आणि ९ जून रोजी 'हे उपाय टिकाऊ नाहीत' असे चार अग्रलेख लिहिले. इंग्रज सरकार अशा क्षणांची वाट पाहत होते. त्यांनी अगोदर 'काळ' या वृत्तपत्राचे संपादक प्रा. शिवराम म. परांजपे यांना अटक करून ११ जून १९०८ रोजी परांजपे यांना राजद्रोही खटल्याबद्दल १९ महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा दिली.

यामुळे टिळकांना अटक व मोठी शिक्षा याचा अंदाज अनेकांना आला होता. टिळक परांजपे यांना सल्ला देण्यास निघाले तेव्हाच त्यांना अटक होईल, हे टिळकांना अगोदरच सांगितले होते. त्यावर टिळकांनी हसून उत्तर दिले, ''मी व्यवस्था कशाची लावायची? मला काही किल्ल्यावरील हल्ला थोपवायला सैन्याची हलवाहलव करावयाची आहे, की खंदक खोदावयाचे आहेत? सरकारने संपूर्ण राष्ट्राचाच तुरुंग केला आहे. अशा वेळी तुरुंगात जाणे म्हणजे केवळ मोठ्या कोठडीतून छोट्या कोठडीत बंदिवान होण्यासारखे आहे.'' टिळकांना २३ जूनला वॉरंट बजावले. बॅ. जीनांनी युक्तिवाद केला तेव्हा सरकारी वकिल ब्रन्सन जेव्हा युक्तिवाद करावयास उभे राहिले, तेव्हा न्या. दावर यांनी त्यांना थांबवले, दावर म्हणाले, ''तुम्ही बाजू मांडू नका. कोणतीही चर्चा न करता मी हा जामिनाचा अर्ज नाकारत आहे.'' बॅ. बाप्टिस्टांनी पंचमंडळी स्थापन करण्याबाबत युक्तिवाद केला; पण तोही फेटाळला.

१३ जुलै रोजी १९०८ ला खटला सुरू झाला. शिक्षा होणारच म्हणून टिळकांनी स्वत:च बाजू मांडली. बॅ. जीना यांनी त्यांच्या आठवणीत लिहिले आहे, 'टिळकांना खटला दोषमुक्त सिद्ध करण्यापेक्षा, स्वत:च्या बचावापेक्षा भारताच्या स्वातंत्र्य संघर्षातील दिशा लोकांपर्यंत पोहोचवायची होती.' भारताच्या राजकीय आकांक्षांचा उद्गार वाढवणारी व्यक्ती म्हणून टिळक राष्ट्रीय सन्मानाचे प्रतीक ठरले. टिळकांनी स्वत:चा युक्तिवाद न्यायालयीन साडेतीन दिवस म्हणजे २१ तास दहा मिनिटे केला; पण ज्यूरींनी सात विरुद्ध दोन असा बहुमताने निर्णय दिला. त्यावर टिळकांचे उद्गार मुंबई हायकोर्टात न्या. छागला यांनी एका पाटीवर नोंदवून ठेवले आहेत.

''पंच मंडळाचा निवाडा काहीही असला, तरी मी निरपराध आहे, एवढे मला म्हणावयाचे आहे. नियतीवर राज्य करणाऱ्या सर्वोच्च शक्ती असतात आणि कदाचित

मी मुक्त राहण्याऐवजी शिक्षा भोगल्याने मी हाती घेतलेले कार्य सिद्धीस जाईल अशी ईश्वराची इच्छा असेल.''

लोकमान्य टिळकांना शिक्षा सुनवायच्या अगोदर सरकार टिळकांच्या लोकप्रियतेला किती घाबरत होते आणि त्यांना दोषी ठरवण्याचे अगोदर कसे ठरले होते ते सरकारने मुंबईत दंगा होऊ नये यासाठी केलेली तयारी पाहिली की कळते.

रात्री १० वाजता निकाल देण्यात आला आणि टिळकांना दुसऱ्या दरवाजाने सुरत येथे नेण्यात आले; पण सरकारने मुंबईत जी तयारी केली होती ती वाचकांना देणे आवश्यक आहे. मुंबईत गॅरिसनने तीन लष्करी कंपनींना बोलावून घेतले होते. पन्नास हजार इंग्रज सोजिरांना सज्ज ठेवले होते. भारतीय सैनिकांची एक सशस्त्र रेजिमेंट सज्ज होती. १२७४ होमगार्ड तयार ठेवण्यात आले होते. हे सर्व रायफल, संगिनी आणि तोफांनी सज्ज होते. याशिवाय पोलीस दल आणि ८५ गोरे अधिकारी रिव्हॉल्व्हर घेऊन सज्ज होते. २०३८ राखीव भारतीय व सशस्त्र पोलीस दल हजर होते.

टिळकांना दोषी ठरवून हद्दपार केल्याची बातमी भारतात पटकन पसरली. मुंबईत कामगारांनी उत्स्फूर्तपणे सहा दिवसांचा संप पुकारला आणि निदर्शने केली. सहा वर्षांची शिक्षा म्हणून सहा दिवसांचा संप दोन लाख कामगारांनी केला. लेनीनने या संपाची दखल घेतली; पण शांततापूर्ण चाललेल्या संपाला पोलिसांनी हिंसक वळण दिले. सैन्यदलाला पाचारण करण्यात आले. १५ लोक गोळीबारात मरण पावले आणि ३८ लोक जखमी झाले.

मँचेस्टर गार्डीयनमध्ये म्हटले होते– 'श्री. टिळक यांना देण्यात आलेल्या शिक्षेचे स्वरूप विचारात घेतले, तर सरकारने काहीही करून त्यांना आपल्या मार्गातून दूर करण्याचा निश्चय केला होता. याचा पुरावा म्हणून भारतात या घटनेकडे पाहिले जाईल.'

१९१८ च्या अगोदर भारतातच सर्व कामगारांचे हित सांभाळणारी एकही कामगार संघटना नव्हती. १९१९ मध्ये आंतरराष्ट्रीय कामगार संघटना स्थापन झाली. त्याच्याअगोदर इतर कामगार संघटनांबरोबर इंडियन लेबर लीग किंवा हिंदी मजूर संघ यांनी मुंबई इलाख्यात गिरण्या, कारखाने, पोस्ट, पश्चिम व मध्य रेल्वे कामगारांच्या हिताचे रक्षण केले.

हिंदी मजूर संघाची कचेरी लेडी जमशेदजी रोड, दादर येथे होती. लीगचे अध्यक्ष बॅ. पवार हे होते व चिटणीस शं. व्ही. गावडे होते. डॉ. दी. धों. साठे व डॉ. मो. बा. वेलकर हे लेबर लीगच्या ऑल इंडिया कमिटीवर होते. डॉ. साठे आणि वेलकर त्यावेळी लोकमान्यांचे सहकारी व गणेशोत्सव व शिवजयंती उत्सवाचे कार्यकर्ते म्हणून कामगार वर्गात खूप लोकप्रिय होते. मुंबईत साथीच्या रोगाच्यावेळी त्यांनी कामगार वस्तीत जाऊन कार्य केले होते.

१८९० मध्ये मुंबईतील म्युनिसिपल सफाई कामगारांनी काम बंद केले. त्याकाळी केसरीने या कटाला/संपाला त्यांच्या बाजूने मत मांडले. तसेच १८९९ मध्ये जी.आय.पी. रेल्वेच्या टार मास्तरांनी संप पुकारला. त्या वेळीही केसरीने हा संप नेट धरून चालवावा म्हणून कामगारांची बाजू घेतली. तसेच १९०३ मध्ये चहाच्या मळ्यातील कामगारांविरुद्ध आणलेल्या प्लँन्टर लेबर बिलाला केसरीने कडवा विरोध दर्शविला होता. १९०७ साली टिळक म्हणतात, 'मजुरांच्या चळवळी राष्ट्रीय नसून सामाजिक व आर्थिक असतात; पण राष्ट्रीय चळवळी व कामगार चळवळी विभागता येणार नाहीत. हिंदी मजूर वर्गास राष्ट्रीय चळवळीतून वगळून स्वराज्याचे हक्क हिंदुस्थानने मिळवले तर गोरी नोकरशाही जाऊन काळी नोकरशाही प्राप्त होईल व ते काही खरे स्वराज्य होणार नाही.' खरे तर १९०६ मध्ये लोकमान्य टिळकांनी कामगारांच्या हक्कासाठी सरकारविरुद्ध झगडण्यासाठी हिंदी मजुरांची एक मजबूत संघटना उभारली पाहिजे, असे सार्वजनिक सभेत प्रथम सुचवले होते. भारतीय कामगार चळवळीचा नोकरशाहीला विरोध हा स्वराज्य संपादनाचा एक मार्ग आहे, असे धोरण टिळकांनी १८९० मध्येच निश्चित केले होते, आणि म्हणून लाला लजपतराय यांनी लोकमान्य टिळकांबद्दल पुढील उद्‌गार काढले होते. "Tilak's return to India, it might be said as a nationalist labour leader."

मंडालेतील कारावास भोगून लोकमान्य टिळक १९१४ मध्ये भारतात परतले. त्यानंतर इंडियन होमरूल लीग किंवा हिंद स्वराज्य संघ स्थापन करून त्यांनी पुन्हा एकदा स्वराज्याची चळवळ उभी केली. ब्रिटिश पार्लमेंटपुढे होमरुल लीग बाबतची मागणी करण्याकरिता एक शिष्टमंडळ तसेच इंडियन लेबर लीग यांचेही एक



शिष्टमंडळ लंडनला पाठविण्याचे ठरविण्यात आले.

पहिले महायुद्ध संपल्यानंतर ब्रिटिश पार्लमेंटपुढे हिंदवी स्वातंत्र्याच्या मार्गातील एक टप्पाच म्हणून माँटेग्यु चेम्सफोर्ड सुधारणांच्या संदर्भात एक शिष्टमंडळ विलायतेला पाठविण्याचे ठरवले. हिंद मजूर संघातर्फे लोकमान्य टिळक, डॉ. वेलकर, श्री. ना. म. जोशी हे कार्यकारिणीचे सभासद होते; परंतु ना. म. जोशी हे ब्रिटिश सरकारचे प्रतिनिधी असल्यामुळे त्या जागी डॉ. साठे यांची निवड करण्यात आली. हिंदी मजूर संघाने १६ जुलै १९१९ रोजी आपल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत एका ठरावाने असे ठरवले की, हिंदी मजुरांची दैन्यावस्था, कामाचे १२ ऐवजी ८ तास करणे, आठवड्यातील एक दिवशी व सणाचे दिवशी भरपगारी रजा इ. हिंदी मजुरांचे गाऱ्हाणे ब्रिटिश पार्लमेंटपुढे प्रतिनिधी यांनी यशस्वीरीत्या मांडावी आणि त्यासाठी ब्रिटिश मजूर पक्षाला श्रम व भांडवल या संदर्भात समानतेच्या तत्त्वावर कायद्यातच समाधानकारक सुधारणा घडवून आणण्यासाठी तशी विनंती करावी.

विलायतेत स्कॉटलंड, एडिंबरा येथे स्टुडंट्स युनियन, इंडियन असोसिएशन व तेथील ट्रेड युनियन काँग्रेस संस्थांतर्फे झालेल्या सभेत लोकमान्य टिळक व डॉ. वेलकर यांची व्याख्याने झाली. या सभेला शेकडो इंग्रज कामगार उपस्थित होते.

दि. २५ सप्टेंबर रोजी इंटरनॅशनल ब्रदरहुड वेलफेअर असोसिएशनच्या लंडन शाखेचे उद्घाटन होणार होते. अमेरिकेतील मजूर व इंग्लंडमधील मजूर एकत्र आणण्याच्या उद्देशाने या आंतरराष्ट्रीय मजूर संघाने लंडन येथे सभा भरवली होती. हिंदी मजुरांनीही या आंतरराष्ट्रीय संघटनेत सामील व्हावे म्हणजे कामगारांचे हक्क प्रस्थापित करण्यास मदत होईल म्हणून लोकमान्य टिळक व डॉ. वेलकर यांना विशेष आमंत्रण होते. या दोघांनाही सभेच्या दिवशी व्यासपीठावर बसवण्यात आले. त्या दोघांचीही भाषणे त्या वेळी झाली.

टिळक म्हणाले, ''हिंदुस्थानातील मजुरांची चळवळ अजून बाल्यावस्थेत आहे. ती जेव्हा सर्व देशात भव्य स्वरूपात होईल त्या वेळी नक्की येथील मजुरांच्या चळवळीवर हुकूम झालेली दिसून येईल व जागतिक संघटनेशीही सहकार्य करेल.'' (संदर्भ:– ३ ऑक्टोबर १९१९ इंडिया: लंडन, तसेच विशेष संदर्भ:– इंडियन लेबर लीग रिपोर्ट, डॉ. मो. वा. वेलकर, लंडन डायरी आणि व्ही. व्ही. दिवेकर).

लोकमान्य टिळक ज्या वेळी इंग्लंड दौऱ्यावर होते त्या वेळेला मुंबईचा गव्हर्नर लॉर्ड वेलिंग्डन याने लोकमान्य टिळकांना होमरूल बाबत बोलू न देता एका सभेत त्यांचा अपमान केला होता. जेव्हा हा गव्हर्नर निवृत्त होऊन मायदेशी जाण्यास निघाला तेव्हा त्यास मानपत्र व त्याच्या स्मारकाच्या योजनेच्या विचारार्थ, दि. ११ डिसेंबर १९१८ रोजी टाऊन हॉलमध्ये भरलेल्या सभेला विरोध दर्शविण्यासाठी बॅ. जीना आणि बी. जी. हॅर्निमन यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्यवाद्यांनी गर्दी केली होती. त्यांना हुसकावून लावण्यासाठी स्मारकवादी मवाळांनी आणि गिरणीमालकांनी लॉऱ्या भरून भाडोत्री गिरणी कामगार आणले होते; परंतु प्रत्यक्षात गिरणी कामगारांनी स्वराज्यवाद्यांची बाजू घेऊन वेलिंग्डन स्मारकाचा ठराव हाणून पाडला. टिळकांच्या अपमानाचा बदला अशा तऱ्हेने स्वराज्यवाद्यांनी घेतला. त्यात कामगार वर्गाचा प्रमुख सहभाग होता.

लंडनमध्ये आंतरराष्ट्रीय संघटनेतर्फे ३० सप्टेंबर १९१९ ला रेल्वे कामगारांनी संप पुकारला. रॉयल अल्बर्ट हॉल आणि टॉवर हिल येथे मजुरांच्या महाप्रचंड सभा झाल्या. लोकमान्य टिळक आणि डॉ. वेलकर यांनी या सभेत भाग घेतला. त्याचा एक फोटो लंडनच्या डेली मेल या वृत्तपत्रात प्रकाशित झाला आहे. या संपात मजुरांचा जय झाला. तसेच हिंदी स्वराज संघ आणि हिंदी मजूर संघ यांच्या मागण्यांना दाद देण्यासाठी ब्रिटिश सरकारने जी पार्लमेंटरी कमिटी नेमली होती, त्या कमिटीपुढे लोकमान्य टिळकांनी हिंदी मजुरांची गाऱ्हाणी ऐकवली, आणि ८ तास काम, आठवड्यातून एक दिवस पगारी रजा वगैरे मागण्यांबाबत कमिटीकडून आश्वासने मिळाल्यावरच इंडियन लेबर लीगचे शिष्टमंडळ मायदेशी परतले.

टिळक मुंबईला परतल्यावर कामगार संघातर्फे एलफिस्टन मिलच्या भव्य पटांगणात दि. २९ नोव्हेंबर १९१९ रोजी त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. सदर सभेत लोकसंग्रह दैनिकाच्या वृत्तान्ताप्रमाणे वीस ते पंचवीस हजारांचा लोक समुदाय जमला होता. या सभेत कामगारांकरिता एक स्वतंत्र वर्तमानपत्र काढण्यात यावे, असेही ठरविण्यात आले आणि ते सुरू होईपर्यंत केसरीने कामगारांविषयीचा मजकूर छापावा, असेही ठरविण्यात आले.

मानपत्राच्या उत्तरादाखल टिळक म्हणाले ते फारच उद्‌बोधक होते, ''धोरणाविरुद्ध झगडण्याकरिता व आपले हक्क प्रस्थापित करण्यासाठी मजुरांची मजबूत संघटना उभारली पाहिजे. तुम्ही एकटे सरकारी धोरणाविरुद्ध कसे झगडणार? व्यक्तिश: हक्क बजावण्याकरिता संघ करावा पण संघ बलवान झाले म्हणजे संघ करणाऱ्यांना तुरुंगात जावे लागेल हे लक्षात ठेवा. संकटे सोसल्याशिवाय हक्क मिळत नाहीत. सरकारने आपल्या पसंतीचा प्रतिनिधी तुमच्यावर लादला आहे.'' टिळक पुढे म्हणतात, ''देश परिस्थिती पाहून आपणही या चळवळीत हात घातला पाहिजे. पाश्चात्त्य देशांप्रमाणेच माझ्या देशातील मजूर व भांडवलवाले यांच्यामध्ये मला तेढ उत्पन्न करायची नाही. मला मजुरांची संघटना व्हावयाला पाहिजे. एम्प्लॉयमेंट एक्सचेंज, को-ऑप. क्रेडिट सोसायटी स्थापन करण्यासाठी मी मजूर वर्गाचे चित्त खेचू इच्छितो. सन १९०६ व १९०७ मध्ये मजूर वर्गामधे फैलावत असलेल्या दारूच्या व्यसनापासून त्यांना परावृत्त करण्यासाठी मद्यपान निषेधाची मोठी चळवळ मी महाराष्ट्रभर केली; परंतु सरकारकडून त्या चळवळीला अडथळा आणण्यात आला. मजूर लोकांची स्थिती सुधारावी, अशी माझी फार इच्छा आहे. मुंबई मजूर लोकांची आहे. आपली कोकणातील घरेदारे सोडून मुंबईत येऊन राहण्यावरच मुंबईतील श्रीमंती अवलंबून आहे. तेव्हा मजुरांनी दु:खामध्ये काळ लोटलेला पाहणे कोणाला बरे आवडेल? औद्योगिक बाबतीत निकृष्टावस्थेत पोहोचलेल्या आपल्या देशामध्ये नुकत्याच कोठे जन्मास आलेल्या कारखाने व गिरण्यांना परदेशातील राजसत्तेचे ज्यांना पाठबळ आहे अशा कारखान्यांशी स्पर्धा करावयाची आहे. मजूर आणि भांडवलवाले यांच्यातील लढा आणि संपत्तीची अयोग्य वाटणी नाहीशी करणे आवश्यक आहे.'' यानंतर लोकमान्य टिळकांचे दीड वर्षातच देहावसान झाले. त्यामुळे कामगार चळवळीचे खूप नुकसान झाले.

बा. र. सुंठणकर यांनी महाराष्ट्र टाईम्समध्ये लिहिलेल्या लेखात टिळकांचे कामगारांविषयक प्रेमाबाबत अजून काही संशोधन केले आहे. त्यात ''जाती, धर्म इ. भेद बाजूला सारून तुम्ही एकी केली पाहिजे. इंग्लंडमधील मजूर संघटना तुमच्या पाठीशी उभ्या राहतील याची खात्री बाळगा. खरे म्हणजे हा संदेश तुम्हाला देण्याची कामगिरी त्यांनी माझ्यावर सोपवली आहे. आकाशातून पडणारे दान म्हणून तुम्हाला तुमच्या

मागण्या मिळणार नाहीत, तुम्हाला दिलेले हात काम करण्यासाठी नाहीत तर कशासाठी आहेत? काम म्हणजे नुसते शारीरिक काम नव्हे, 'राष्ट्रीय कामसुद्धा' जे जे स्वत:ला मदत करतात त्यांना देवही मदत करतो. तुमच्या भवितव्याचे धनी तुम्ही आहात, भावी काळात कामगारांना प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त होणार आहे आणि ते उद्दिष्ट समोर ठेवून सर्वांनी कार्य केले पाहिजे. थोड्या वर्षांच्या अवधीत युरोप-अमेरिकेतील राज्ये सामर्थ्यवान झाली. हे काम कामगारांनी करून दाखविले आहे. तसेच आपल्या हिंदुस्थानात का होऊ नये म्हणून माझे तुम्हांला सांगणे आहे की, तुम्ही चालवलेली चळवळ चिकाटीने पुढे चालू ठेवा. काम करू इच्छिणारा माणूस कामाशिवाय उपाशी राहणार नाही, अशी परिस्थिति निर्माण झाली पाहिजे. विरोधक तुम्हाला राजकीय अधिकार नाहीत असे सांगून भेडसावतील, तुमची दिशाभूल करण्याचे प्रयत्न होतील; पण तुम्ही त्याला बळी पडता कामा नये. ही चळवळ काही वरिष्ठ वर्गाने चालवलेली नाही. ती सामान्य जनांनी चालवलेली आहे. मी ही चळवळ वरिष्ठ वर्गाच्या हिताकरिता नव्हे तर बहुजन समाजाच्या हितासाठी सांगतो. मी सामान्य जनांतून आलो आहे. सामान्य जनांकरिता काम करू इच्छितो. मी सामान्य माणूस म्हणून मरेन, मी अस्सल लोकशाहीवादी आहे. तुमचा प्रवक्ता म्हणून कार्य करणे, हा मी मोठा सन्मान समजतो.

''कोणते सरकार सत्तेवर आहे, याची पर्वा कामगार करीत नाहीत. या सरकारच्या अमलाखाली आम्हाला चांगले जीवन जगायला मिळाले पाहिजे, याचीच त्याला काळजी असते. कामगारांनी राजकारण्यांच्या मागून जाऊ नये असे सरकारला वाटत असेल, तर त्यांच्याकरिता चांगले जीवनमान पुरविण्याचे आपले कर्तव्य सरकारने पार पाडले पाहिजे.

''संपत्ती ही कामगार निर्माण करीत असतात. म्हणून ती संपत्ती सर्वांआधी जे हात ती निर्माण करतात, त्यांच्या मालकीची असते. यासाठीच मी म्हणतो, की तुमच्या श्रमांनी जी संपत्ती तुम्ही निर्माण करता तिचा योग्य तो वाटा मिळण्याचा तुम्हाला हक्क आहे. मुंबईच्या कामगारांना मी सांगितले, की मुंबईचे मालक कामगार हेच आहेत. भांडवलदार नव्हेत. तेच मी तुम्हाला येथे सांगतो. भांडवलदारांना त्यांच्या भांडवलावर फक्त योग्य ते व्याज मिळावे. बाकीचे सर्व कामगारांना मिळाले पाहिजे.''

''तुम्हाला पहिली गोष्ट सांगावयाची आहे ती ही, की मी तुमच्यासारखाच एक मजूर आहे. तुम्ही हातानी काम करता. मी माझे हात आणि डोके या दोहोंनी काम करतो. इंग्लंडमध्ये हात आणि डोके या दोहोंनी काम करणाऱ्या सर्वांनाच मजूर म्हणतात म्हणून आपण सगळेच मजूर आहोत. ज्या देशात मजुरांना चांगल्या रीतीने जगता येत नाही तो देश राहण्याच्या लायकीचा नाही. जे सरकार आपल्या मजुरांना चांगल्या प्रकारचा चरितार्थ पुरवू शकत नाही, ते सरकार आपले कर्तव्य बजावत नाही. हे तत्त्व इंग्लंड आणि इतर पश्चिमी देशांनी मान्य केले आहे आणि हेच तत्त्व पुढारलेल्या राष्ट्रांनी आपल्या अंकित देशांच्या बाबतीत मान्य केले पाहिजे.''
(संदर्भ: बा. र. सुंठणकर यांच्या सौजन्याने महाराष्ट्र टाईम्स, रविवार २९ जुलै १९९०)

बेझंटबाईंचे एक सहकारी बी. टी. वाडिया मद्रासमध्ये कामगारांना संघटित करण्याचे काम करीत होते. त्यांच्या पुढाकाराने टिळकांचा सत्कार करण्यासाठी दुसऱ्या दिवशी कामगारांची एक स्वतंत्र सभा आयोजित केली गेली होती. मद्रास लेबर युनियन्सतर्फे झालेल्या या सभेत मानपत्र अर्पण केले गेल्यानंतर टिळकांनी उत्तरादाखल केलेले भाषण महत्त्वाचे आहे. लोकमान्य म्हणाले, ''मी इंग्लंडहून परत आल्यानंतर मुंबईतील कामगारांनीही मला मानपत्र दिले. त्याला उत्तर देताना मी कामगारांच्या भाषेत बोलू शकलो. आज मला तुमच्या भाषेत बोलता येत नाही याबद्दल मला दुःख वाटते; परंतु तुमचा उत्साह आणि तुमची भावना माझ्यासाठी मुंबईच्या कामगारांइतकीच महत्त्वाची आहे.

''तुम्ही कायदेशीर रीतीने आपली चळवळ चालवीत असाल तोपर्यंत ती चुकीची म्हणताच येणार नाही. इंग्लंडमधल्या पोलिसाला दर आठवड्याला तीन पौंड म्हणजे दरमहा सुमारे १३० रुपये मिळतात. येथे तुम्हाला दररोज आठ आणेसुद्धा मिळत नाहीत. या परिस्थितीत सुधारणा व्हावयाची असेल, तर त्यासाठीचा मार्ग म्हणजे तुमच्या संघटना मजबूत झाल्या पाहिजेत. तुमचे अज्ञान, तुमचे स्वतःच्या हिताकडे असलेले दुर्लक्ष यामुळेच ही परिस्थिती सुधारत नाही. तुम्ही स्वतः संघटित झालात तर ती बदलेल.''

ब्राह्मणेतर आणि कामगार यांनी दिलेली ही मानपत्रे लोकमान्य टिळकांसाठी गौरवचिन्हे होती. लोकमान्य

आणि कामगारवर्ग यांचे एक विशेष नाते होते. चिरोल खटल्यासाठी इंग्लंडमध्ये जाण्यापूर्वी २४ फेब्रुवारी १९१८ रोजी मुंबईच्या कामगारांनी लोकमान्यांना एक मानपत्र दिले होते. या सभेत त्यांना स्वराज्य फंडासाठी एक हजार रुपयांची थैलीही अर्पण करण्यात आली होती. रक्कम फारच लहान होती; पण तिचे वैशिष्ट्य फार मोठे होते. मुंबईच्या सोळा हजार कामगारांनी प्रत्येकी एक-एक आणा गोळा करून ही रक्कम जमा केलेली होती. (सोळा आण्यांचा एक रुपया होत असे.)

मुंबईच्या गिरण्यांतून दोन लाख कामगार काम करतात. बहुतेक सगळे कोकणातून आलेले असतात. त्यांच्या वाडवडलांचे कोकणात असलेल्या शेतीवर भागत होते. आता यांचा निर्वाह कोकणात होऊ शकत नाही. भीक मागण्याचा प्रसंग येऊ नये म्हणून कामगार मुंबईत येतात; परंतु नाना प्रकारच्या व्यसनांत अडकल्यामुळे पुन्हा कोरडे होऊन कोकणात परत जातात. ''कोकणात असताना गुळाचा खडा आणि पेलाभर गार पाणी याने श्रमपरिहार होत असे. आता चहाचा कप किंवा दारूचा ग्लास का लागतो?'' असाही प्रश्न त्यांनी विचारला होता. 'कामगारांसहित सर्वांनी स्वदेशीचा पुरस्कार केला, तर देशाची गरिबी कमी होण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

टिळक हे पहिले भारतीय राष्ट्रीय नेते होते, त्यांनी कामगारांचे आणि कामगार संघटनांचे महत्त्व ओळखले होते. म्हणूनच शेतकऱ्यांच्या प्रश्नांइतके कामगारांच्या प्रश्नांचेसुद्धा त्यांना महत्त्व वाटत होते.
(संदर्भ: लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी- नरेंद्र चपळगावकर)

इंडियन लेबर लीग, रिपोर्ट, संदेश वृत्तपत्रातील दि. १६/०७/१९१९ मधील लोकमान्य टिळकांचे संपूर्ण व्याख्यान, डॉ. मो. बा. वेलकर यांनी लिहिलेल्या 'डायरीतील नोंदी', डॉ. व्ही. डी. दिवेकर यांचे 'टिळक इन लंडन' हे पुस्तक, डॉ. व्ही. जी. नाईक यांचा संशोधन निबंध अशा अनेक मूलभूत संशोधनांतून लोकमान्य टिळक आणि भारतीय कामगार याविषयी नवी माहिती आज मिळते. टिळकांनी आयटक या संघटनेच्या उपाध्यक्षपदाचा स्वीकारदेखील केला होता. एकूण ही माहिती वाचत असताना कदाचित टिळक हे साम्यवादी विचारांचे होते, असा समज होणे शक्य आहे; परंतु टिळकांनी आपल्या कामगारांनी केलेल्या सत्कारामध्येच मी कसा पक्का लोकशाहीवादी हे स्पष्ट केले आहे. शेतकरी, कामगार आणि विणकर या वर्गातील लोकांची दैन्यावस्था पाहून लोकमान्य टिळकांनी त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी, त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी त्यांना संघटित केले. टिळक एका ठिकाणी असेही म्हणतात, 'स्वदेशी उद्योग हे आता बाल्यावस्थेत आहेत, अशा वेळेस मालक आणि कामगार यांच्यामध्ये तणाव उत्पन्न होईल अशी चळवळ या देशाच्या उत्कर्षाला घातक आहे; परंतु कामगारांना त्यांच्या श्रमशक्तीचा मोबदला मिळणे आवश्यक आहे.' लोकमान्य टिळक हे द्रष्टे नेते होते आणि त्यांना स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सर्व थरातील लोक एकसंघ करून स्वातंत्र्याच्या पाठीमागे उभे राहणे आवश्यक वाटत होते. लोकमान्य टिळकांच्या या विचारांमुळे डिसेंबर १९१६ मध्ये लखनौ काँग्रेस अधिवेशनामध्ये सर्व जाती-धर्म-वर्गातील लोकांनी एकत्र येऊन स्वराज्याची एकमुखी मागणी केली. लोकमान्य टिळकांची कामगारविषयक भूमिका केसरीच्या वाचकांना समजावी म्हणून हा सर्व धांडोळा.

संदर्भ :
१) टिळक डी. जे., टिळक जी. (२०२०) लोकमान्य टिळक्स व्हिजिनरी थॉट टुवर्ड्स नॅशनॅलिझम ॲण्ड नेशन बिल्डिंग
२) टिळक डी. जे., टिळक जी. (२०२०) लोकमान्य टिळक्स एडिटोरियल्स फॉर मास एज्युकेशन
३) डी. व्ही. दिवेकर (१९१९) लंडन डायरी
४) चपळगावकर एन. (२०२०) लोकमान्य टिळक ॲण्ड महात्मा गांधी, समकालीन प्रकाशन
५) एम. बी. वेलकर (१९१९) लंडन डायरी
६) सुंठणकर बी. आर. (१९९०, जुलै २९) महाराष्ट्र टाइम्स
७) व्ही. डी. दिवेकर (१९९७) लोकमान्य टिळक इन इंग्लंड, १९१८-१९ टिळक स्मारक ट्रस्ट.
८) वेलकर एम. वी. (२०१२), अव्यक्त लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, टिळक स्मारक ट्रस्ट.
९) टिळक डी. जे., टिळक जी. (२०१९) लोकमान्य बी. जी. टिळक - द व्हिजिनरी.

**प्रो. (डॉ.) गीताली टिळक**
प्रोफेसर, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे-३७.
geetali.tilak@gmail.com